http://www.sgbauonline.com/



# M.A. Part–I Marathi (Semester–I) Examination

## MARATHI

## Paper—3(A)

## (Sahityakrutincha Abhyas)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना :—** (1) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

(2) वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिल्यास मूल्यांकनासाठी पहिले उत्तर ग्राह्य धरण्यात येईल.

1. 'सभापर्वा' च्या रचनातत्वाचा आणि संक्षेपशैलीचा आढावा घ्या.

**किंवा**

''सभापर्वा' तील अध्याय सहा व सातमधील 'जरासंध जन्म-वध प्रसंग' उलगडून दाखवा.

2. 'आज्ञापत्रा' तील राजनीतीची वाङ्मयीन भाषा कशी आहे, ते सांगा.

**किंवा**

'आज्ञापत्रा' तील 'दुर्ग' आणि 'आरमार' या पाठाद्वारे तत्कालिन संरक्षणव्यवस्थेच्या बाबी स्पष्ट करा.

3. ललित गद्य प्रकारातील प्रवासवर्णनांचे स्थान सांगून 'जावे त्यांच्या देशा' तील पुलंची ललितशैली उलगडून दाखवा.

**किंवा**

'एक बेपत्ता देश' या पाठातील अमेरिकेबाबतचे पुलंचे मत स्पष्ट करा.

4. 'आपण सारे अर्जुन' मधून जीवनातील संभ्रमावस्थेचे चित्रण कसे केले आहे, ते सांगा.

**किंवा**

"संघर्षातही स्वत:च आणि प्रतिस्पर्ध्याचं सामर्थ्य माहीत असावं लागतं. मला त्यामुळेच महाभारत म्हणजे 'चालू वर्तमानकाळ' वाटतो," असे वपुंना का वाटते, ते सांगा.

5. खालील वस्तुनिष्ठ प्रश्नांचे योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा : (उदाहरण प्र. क्र. 1 (ड) ह.ना. आपटे) :

(1) द्वारके गेलिया __________। पुढे वर्तलाजो वृत्तांत। जयन्मेजया प्रति सांगत।।

(अ) द्वारकानाथ (ब) कृष्णनाथ

(क) यदुनाथ (ड) प्राणनाथ

(2) पुरुषांसन्मुख स्त्रियेचि निंदा। ते मानिजे __________ अपराधा।।

(अ) शत (ब) सहस्त्र

(क) दशसहस्त्र (ड) कोटी



http://www.sgbauonline.com/

(3) 'हाक मारिता याज्ञसेनी। कंपे थरारली मेदिनी।' यातील 'मेदिनी' शब्दाचा अर्थ काय ?

(अ) मेद पर्वत (ब) मेदिनी राक्षसीन

(क) दुर्योधनपत्नी (ड) पृथ्वी

(4) अतएव, "राजा ________ कारणं."

(अ) वयस्य (ब) नाशस्य

(क) यशस्य (ड) कालस्य

(5) कोणत्या प्रसंगामुळे कित्येकजण योगक्षेम विषयीं कुंठित बुद्धी व हतधैर्य जाहले होते ?

(अ) बिकट प्रसंग (ब) संभ्रम प्रसंग

(क) विज्वर प्रसंग (ड) समर प्रसंग

(6) मी दिवसभरात झालेले सच्च्या व्हेनिसचे दर्शनच ________ वरून ओवाळून टाकले.

(अ) राजकुमारा (ब) पुतळ्या

(क) इटली (ड) चॅप्लिन

(7) शहरे आणि गुन्हेगारी कशी येत असतात ?

(अ) खांद्याला खांदा लावून (ब) पावलावर पाऊल टाकून

(क) पाठीला पाठ लावून (ड) डोक्यावर चढून

(8) ________ ह्या तीन शब्दांनी माझा अर्जुन केला.

(अ) तुम्ही माझे कोण ? (ब) हे असं का ?

(क) यू. शट अप (ड) शवेटी काय मिळवायचं ?